ज्या व्यक्तीजवळ समाधान, सहनशीलता, सय्यम आणि एकनिष्ठा असते, तो व्यक्ती आयुष्यात काहीही करू शकतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ११ जुले २०२५ | अंक २०३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक I'TIME TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

## आता शहरी नक्षलवाद्यांची खैर नाही, जनसुरक्षा विधेयक मंजूर



विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. जनसुरक्षा विधेयक विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हे विधेयक मांडलं होतं. जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर झालं आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक मांडलं होतं. जनसुरक्षा विधेयकाला विधानसभेत एकमताने मंजुरी देण्यात आली आहे. आवाजी मतदानानं विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. भारतातील जे नक्षलप्रभावीत राज्य आहेत, आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड या रांज्यामध्ये आधीच या प्रकारचा कायदा अस्तित्वात आहे. मात्र महाराष्ट्रात अजूनही तसा कोणताही कायदा नव्हता, त्यामुळे नक्षलवादी, माओवादी आणि अंतर्गत सुरक्षेला धोका पोचवणाऱ्या संघटना आणि व्यक्ती यांच्यावर कारवाई करताना पोलिसांना केंद्राच्या टाडा सारख्या कायद्याचा आधार घ्यावा लागत होता. मात्र आता विधानसभेत जनसुरक्षा विधेयकाला मंजूर देण्यात आली आहे.या कायद्याचा आधार घेऊन आता जर एखादी व्यक्ती सरकारच्या मते सार्वजनिक सुव्यवस्थेला किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरत असेल तर कोणत्याही आरोपांची नोंद करत त्या व्यक्तीला तात्काळ ताब्यात घेण्यात येईल, त्यामुळे सरकारचं काम आणखी सोप होणार आहे.

### नेमकं काय आहे जनसुरक्षा विधेयक?

जनसुरक्षा विधेयकाला आज विधानसभेत मंजुरी देण्यात आली आहे. या कायद्यानुसार जर एखादी व्यक्ती सरकारच्या मते सार्वजनिक सुव्यवस्थेला किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरत असेल तर कोणत्याही आरोपांची नोंद करत त्या व्यक्तीला तात्काळ ताब्यात घेण्यात येतं. जनसुरक्षा कायदा हा दखलपात्र नसलेला कायदा आहे. हे विधेयक किंवा त्याद्वारे भविष्यात निर्माण होणाऱ्या कायद्यामुळे नक्षली चळवळींना मोठा हादरा बसणार आहे. या कायद्यांतर्गत अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटना व्यक्ती तसेच नक्षलवादी आणि माओवादी संघटनांवर कारवाई केली जाणार आहे.


## श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय प्रेरणा पुरस्कार उपप्राचार्य प्रा.डॉ. युवराज मुळये यांना घोषित



माजलगाव - प्रतिनिधी दिनांक ०९/०७/२०२५ येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात उद्या आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवाचे औचित्य साधून श्री सिद्धेश्वर महाविद्यालय प्रेरणा पुरस्कार उपप्राचार्य डॉ. युवराज राजाराम मुळये यांना प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षण, समाज, अध्यापन कार्य, संशोधन कार्य यातील योगदान व महाविद्यालयाचा उत्कर्ष याचा विचार करता त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने त्यांच्या नावाची या पुरस्कारासाठी घोषणा केली.उद्या म हाविद्यालयात संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास भा. शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे यांच्यासह केंद्रीय सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, स्थानिक कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, म हाविद्यालय अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.या कार्यक्रमासाठी श्री सिद्धेश्वर संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचीही उपस्थिती असणार आहे.

## सरपंच पदांचे तालुकानिहाय आरक्षणाचे वाटप जाहीर-उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी

बीड,दिनांक १० : शासन राजपत्र १३ जून २०२५ नुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय सरपंच पदांचे आरक्षणाचे वाटप करण्यात आले आहे. शिवाय संबधित तहसील, ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर अधिसूचना प्रसिद्ध करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी दिल्या आहेत. जिल्ह्यातील एक हजार ३५




ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचे वाटप झाले आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी १४० पैकी ७३, अनुसूचित जम ातीसाठी १३ पैकी ८, मागास प्रवर्गासाठी २७९ पैकी १४२ , खुला प्रवर्गासाठी ६०३ पैकी ३०४ महिलांसाठी आरक्षणाचे वाटप करण्यात आलेले आहे, तर १५ एप्रिल २०२५ च्या शासन राजपत्रान्वये जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवडा ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन पोईतांडा ग्रामपंचायती निर्मिती नव्याने झाली आहे, असेही श्री. सूर्यवंशी यांनी कळवले आहे.

*****

## खोट्या पदभरतीच्या जाहिरातीसंदर्भात नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

### पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाकडून स्पष्टीकरण

बीड, दिनांक १० : जिल्ह्यात पशु आरोग्य सेवक पदासाठी शासनामार्फत भरती होत असल्याची खोटी माहिती समाज माध्यमे, विविध माध्यमांतून प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात पशुसंवर्धन विभागामार्फत अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे, की सद्यस्थितीत अशा कोणत्याही भरतीसाठी प्रक्रिया सुरू नाही. ही माहिती फसवणूक करणाऱ्यांनी हेतूपुरस्सर पसरवली आहे. त्याद्वारे आर्थिक लाभ मिळण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. आर.डी. कदम यांनी कळवले आहे.

अशा बनावट भरतीच्या जाहिरातींना बळी न पडता नागरिकांनी अधिकृत शासकीय संकेतस्थळांवरूनच खात्री करावी. बीड शहर पोलिस विभागामार्फत यासंदर्भात उपाययोजना करण्यात येत आहेत. संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून नागरिकांनी कोणतीही भरती किंवा जाहिरात मिळाल्यास तिची खातरजमा अधिकृत शासकीय संकेतस्थळावरून करावी. कुठलीही संशयास्पद माहिती आढळल्यास तत्काळ नजिकच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, असेही कदम यांनी कळवले आहे.

******

## गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे - महंत दत्ता महाराज गिरी

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

गेवराई : ईश्वराचे सगुण रुप म्हणजे गुरु आणि गुरुंचे निर्गुण रुप म्हणजे ईश्वर होय जीवनात प्रत्येकाने गुरु केला पाहिजे. गुरुशिवाय तरणोपाय नाही. अंध:काराचा नाश करुन त्याचे परब्रह्माशी मिलन घडवून आणण्याचे कार्य गुरु करतात त्यामुळे गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे असे प्रतिपादन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प. दत्ता महाराज गिरी यांनी गुरुपोर्णिमेनिमित्त आयोजित बोलताना केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव (ता.गेवराई) येथे महान तपस्वी तपोनिधी वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत ह.भ.प.बुधगिरीजी म हाराज यांच्या १११ व्या पुण्यतिथी



व गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवार दि.१० जुलै रोजी सकाळी ११ ते १ यावेळेत गुरुपुजनाचा व समाधीवर गंगोदकाचा अभिषेक करुन गुरुपुजन सोहळा तसेच प्रवचण, भजन यासह विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दामोधर भोसले, युवा नेते शिवराज पवार, महादेव गरुड , परमेश्वर काळे, कैलास पांगरे, राजाभाऊ माने सुभाषराव ढोकळे, कैलासबाबा गिरी, रामबप्पा लेंडगुळे, पत्रकार विनोद पौळ, उमेश भोसले, शिवाजी ढोबळे, महादेव बिचकुले, जयदिप गोल्हार, संतोष सोळुंके, माऊली पांगरे ,

नंदकुमार पौळ, विठ्ठल घुगे, सखाराम गिरी, गोपाल गिरी यांच्या सह पंचक्रोशीतील भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना दत्ता महाराज यांनी सांगितले की सध्या पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.तरी प्रत्येकाने आपल्या परिसरात एक तरी झाड लावुन त्यांचे संवर्धन केले पाहिजे. यामुळे निसर्गाचा समतोल राहील. तसेच आपल्या आई वडिलांची सेवा करुन त्यांची काळजी घ्या असा मौलिक सल्ला ही यावेळी शेवटी बोलताना दिला. तर गुरुपौर्णिमेनिमित्त महंत दत्ता महाराज गिरी यांचे गुरुपुजन झाले. या नंतर दामोधर भोसले,

उमेश भोसले, कैलास भोसले, म हादेव बिचकुले, लक्ष्मण नाथा कोकरे, वैजीनाथ रोमन या भक्त मंडळीच्या वतिने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील तसेच गोरी येथील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लिंबारुई येथे मौन अनुष्ठान हाटयोगी साधना

पिंपळनेर/ प्रतिनिधी : बीड तालुक्यातील लिंबारुई येथील दक्षिणाभिमुख स्वयंभू संगमेश्वर व स्वयंभू महादेव मंदिरात मठाधिपती बालयोगी भगवान महाराज दि.९ जुलैपासून मौन अनुष्ठान हाटयोगी साधनेस सुरुवात करणार आहेत. ही साधना सहा महिने चालणार असल्याची माहिती देण्यात आली. लिंबारुई येथे संगमेश्वर गणेश व म हादेवाचे मंदिर आहे या मंदिरात चे मठाधिपती म्हणून श्री बालयोगी भगवान महाराज हे गत अनेक दिवसापासून काम करत आहेत. या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असतात. यावर्षी म ोहन अनुष्ठान हाटयोगी साधना महाराज करणार आहेत जुलै म हिन्यात या साधनेला सुरुवात होणार असून समारोप डिसेंबर म हिन्यात होणार आहे दि.९ जुलै रोजी दुपारी बालयोगी श्री भगवान महाराज या साधनेला सुरुवात करणार आहेत. या कालावधीम ध्ये महाराज कोणाच्याही संपर्कात राहणार नाहीत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय तपोनिधी आखाड्याचे सचिव गणेशानंद सरस्वती स्वामी महाराज व अखिल भारतीय संत समिती महाराष्ट्र राज्याचे मुख्य संरक्षक धर्मगुरू अमृत आश्रम स्वामी महाराज यांची उपस्थिती राहणार आहे. दि. ९ जुलै रोजी सुरू झालेल्या या मौन अनुष्ठान हाटयोगी साधनेचा समारोप दि. २० डिसेंबर रोजी म्हणजे सहा म हिन्यानंतर होणार आहे.

## रोहयोची ओरड; मा.सभापती गवतेंनी घेतली अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक

### बीड पंचायत समितीत सरपंचांची गर्दी, ७ हजार मस्टरचे पैसे तातडीने सोडण्याचे बीडीओंचे आश्वासन

बीड: बीड पंचायत समितीमध्ये म हात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबत तक्रारी वाढत असून मस्टर ऑनलाईन करूनही पैसे मिळत नसल्याच्या तक्रारी बीड मतदारसंघातील नागरिकांनी राष्ट्रवादीचे युवानेते तथा पंचायत समितीचे माजी सभापती यांच्याकडे केल्या होत्या. यानंतर दि.१० जुलै रोजी सभापती गवते यांनी बीड पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी कांबळे आणि कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. यावेळी दोन दिवसात रोहयाचा निधी वितरीत करण्याचे आश्वासन गटविकास अधिकारी कांबळे यांनी दिले.

बीड पंचायत समितीमध्ये मागील काही दिवसांपासून रोजगार हमी योजनेसह विविध विकास कामे वेळेत होत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. मागील पंधरा दिवसांपुर्वीच मतदारसंघातील सरपंचांकडून येणाऱ्या जाणून घेत पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन चर्चा केली होती. यानंतरही रोहयोचे पैसे वेळेत जाण नसल्याचे समोर येऊ लागल्याने दि.१० जुलै रोजी गटविकास अधिकारी कांबळे यांच्या समवेत पंचायत समिती येथे अधिकारी-कर्मचारी यांची संयुक्त बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीत रोजगार हमी



योजनेमधील प्रलंबित असलेले ७००० म स्टरच्या निधीचे वितरण तातडीने व्हावे, असे म्हटले. यावेळी सर्व मस्टरबाबतीतील निधी वितरीत दोन दिवसात होईल, असा शब्द गटविकास अधिकारी कांबळे यांनी दिला. याच बरोबर घरकुलांची मंजुरी करणे, मंजूर झालेल्या घरकुलांचा पहिला हप्ता सोडणे, हेही विषय उपस्थित करण्यात आले. दरम्यान, लाभार्थ्यांच्या प्रश्नाबरोबरच रोजगार सेवकांच्या मानधनाचा प्रश्न देखील त्यांनी यावेळी उपस्थित केला. यावेळी पंचायत समितीमधील कर्मचारी, अधिकारी यांना येणाऱ्या अडचणी देखील जाणून घेत आपण राष्ट्रवादीच्या जेष्ठ नेत्यांकडे अडचणी मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू, असा विश्वासही यावेळी कर्मचाऱ्यांना दिला. यावेळी बीड मतदारसंघातून आलेले सरपंच, उपसरपंच, ग्रामरोजगार सेवक संघटना,नागरिकांची उपस्थिती होती.

## संपादकीय

### कोकणातले पावसाळी पर्यटन

कोकणात पावसात पर्यटन स्थळांना बहर येतो. पावसाळ्यात या हिरवळीचेही एक वेगळं आकर्षण पर्यटकांना असतं. डोंगर-दऱ्यांतून वाहणारे झरे, डोंगर उतारावरचे धबधबे हे तर कोकणात जागो-जागी दिसतील. मात्र ही पर्यटनस्थळं कशा पद्धतीने विकसित करता येतील, इथे नव्याने काय करता येईल, याचा अहवालही नुकताच राज्य सरकारकडे सादर केला आहे. मात्र हा मुद्दा केवळ भाषणांपुरता मर्यादित राहू नये... कोकणात सर्वच ऋतू मध्ये पर्यटनासाठी मोठा वाव आहे. म्हणूनच गेल्या तीस वर्षांत कोकणातील पर्यटनस्थळं पर्यटकांच्या गर्दीने बहरलेली असतात. कोकणातल्या पालघरपासून सिंधुदुर्गपर्यंत कितीतरी म्हणजे मोजता येणार नाहीत इतकी पर्यटनस्थळं आहेत. या पर्यटनस्थळांचा पर्यटकांनी पर्यटन स्थळ करायचे ठरवले तरीही बरेच काही हातचे राहून जाईल, अशी स्थिती आहे. गोवा राज्याच्या नजीक असलेला सिंधुदुर्ग जिल्हा आणि मुंबईचा एक भाग बनून राहिलेला ठाणे, पालघर, रायगड हे जिल्हे पर्यटनासाठीही विकसित होत असले तरीही खऱ्या अर्थाने पर्यटनासाठी सर्वाधिक पसंती सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांतील पर्यटनस्थळांना आहे. देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून १९९७ साली महाराष्ट्रातील त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. त्यानंतर कोकणातील पर्यटनस्थळ कोणती आहेत, ती कशा पद्धतीने विकसित करता येतील, यासंबंधीचा टाटा कन्सल्टन्सीकडून सर्व्हे करण्यात आला. टाटा कन्सल्टन्सीकडून कोणती पर्यटनस्थळं कशा पद्धतीने विकसित करता येतील, त्यात नव्याने काय करता येईल याचा अहवाल राज्य सरकारकडे सादर करण्यात आला; परंतु कोकणच्या दुर्दैवाने कोकणातील पर्यटन व्यवसायातून आर्थिक समृद्धी येऊ शकते, महाराष्ट्राच्या तिजोरीत मोठी भर घातली जाऊ शकते, हा आर्थिक सक्षमतेचा विचार राज्यकर्त्यांच्या भाषणांपुरता मर्यादित राहिला तो प्रत्यक्षात साकारला गेला नाही. त्यामुळे कोकणातील पर्यटन हे पर्यटकांची गरज म्हणून वेगवेगळी पर्यटनस्थळं समोर येत गेली. कोकणात पावसाळ्यातही अनेक पर्यटनस्थळं आहेत. पावसाळ्यात कोकणात सगळीकडे हिरवगार असतं. कोकणातील कोणत्याही भागात झाडेझुडपे आणि सारा परिसर हा हिरवा असतो. या हिरवळीचंही एक वेगळं आकर्षण पर्यटकांना असतं. डोंगरदऱ्यांतून वाहणारे झरे, डोंगर उतारावरचे धबधबे हे तर कोकणात जागो-जागी दिसतील. कोकणातील घाट रस्त्यांवरही आकर्षक धबधबे आहेत. म्हणूनच कोकणात पावसाळ्यातही पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. कोकणात नव्याने उद्योगांची चर्चा सुरू झाली तरीही कोणत्याही उद्योगाला विरोध हा ठरलेलाच असतो. मग तो उद्योग कोकणाला पूरक असो किंवा कोकणासाठी हानिकारक असला तरीही त्या चर्चेत येणाऱ्या उद्योगाला पहिला विरोध हा ठरलेलाच असतो. कोणत्याही प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांची एक मानसिकता बनून गे`ली आहे. यामध्ये लोकहिताचा विचार कमी आणि राजकारण अधिक अशी स्थिती आहे. विरोधासाठी विरोध या एका गोष्टीने कोकणात काही गोष्टी येऊ शकल्या नाहीत. सी वर्ल्ड सारखा कोकणाच्या पर्यटनाचं चित्र बदलू शकणारा प्रकल्प केवळ राजकारणातून होऊ शकला नाही. आज नुकसान कोकणचं झालं. एकीकडे पर्यटन विकासाच्या आणि कोकणच्या संस्कृतीच्या नावाने गळा काढणाऱ्यांनीच कोकणच्या पर्यटन प्रकल्पांना सातत्याने विरोध केला. तीस वर्षांपूर्वी ताज, ओबेरॉय सारखी हॉटेल कोकणच्या किनाऱ्यावर उभी राहणार होती; परंतु ती उभी राहू शकली नाहीत. केवळ विरोधामुळेच कोकणात आज जे काही पर्यटक येतात त्यांची संख्या आणखी दुपटीने वाढली असती; परंतु अनेक प्रकल्प येण्यापासून विरोधामुळे येऊ शकले नाहीत. आता कोकणात नव्याने उद्योजक फार कोणी यायला उत्सुक नाहीत. यामुळे नव्याने कोणताही प्रकल्प येत नाही, काही होत नाही. काही होण्यापूर्वीच जो होणारा विरोध आहे या विरोधाचा एक मोठा परिणाम उद्योगक्षेत्रावर झाला आहे. कोकण म्हटलं की, नको रे बाबा असंच काहीसं नकारात्मक असलेलं वातावरण बदलावं लागेल. त्यासाठी निश्चितच काही कालावधी जावू द्यावा लागेल.

# चांगले मार्गदर्शन,प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला गुरु

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील पौर्णिमा साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण गुरू शिवाय ज्ञान नाहीही म्हण सत्य आहे. गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.आई-वडिल हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई-वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण आईग म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दु:ख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण बापरे म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते. म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन. यातुनच गुरू शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते. आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते. त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडु लकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरु दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग, सत्ययुग, कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते. याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते. राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात. आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले. त्यामुळे गुरु शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव, ज्ञान, माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते गुरु बिना ज्ञाण अधुरा. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे. भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत, थोरमहात्मे होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते. ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रित पणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.



रमेश लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर),
६३ बी शिवनगर नागपूर-९.
मो.नं.९३२५१०५७७९.

# प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात गुरुचेस्थान अनन्यसाधारण असते-मधूसुदन महाराज

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात गुरूचे स्थान अनन्यसाधारण असते. गुरू हे आपल्या शिष्याच्या उन्नती साठी सदा सर्वकाळ उपदेश करत असतात. त्यात केवळ आध्यात्मिकच नव्हे तर शिक्षणक्षेत्रासह प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळ्या माध्यमातून हे ज्ञानदानाचे कार्य अनादी काळापासून सतत चालू आहे. ज्ञानप्राप्तीसाठी प्रत्येक शिष्याने गुरूचा सदउपदेश आपल्या दैनंदिन आचरणात आणून गुरूवचनावर दृढ विश्वास ठेवल्यास ज्ञान प्राप्त करून घेऊन आपल्या आयुष्यात सहज यश प्राप्ती करून घेता येते. असे भावपुर्ण उद्गार येथील ज्ञानेश्वरी प्रायमरी ईंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांना मगुरूपोर्णिमा उत्सवानिमित्तफ आयोजित कार्यक्रमात मुख्यमार्गदर्शक म्हणून गुरूवर्य ह.भ.प. मधूसुदन महाराज कापसीकर यांनी काढले. व्यासपीठावरील विश्वमाऊली ज्ञानेश्वर महाराज, संत साईबाबा, स्व.हिन्दुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, व वै. गुरूवर्य ह.भ.प. मामासाहेब मारतळेकर महाराजांच्या प्रतिमांचे पुजन प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्याक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य संजय पाटील ढेपे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी पाटील भरकडे पो. पा. यांचेसह शाळेतील शिक्षकवृंद व्यासपीठावर उपस्थित होते. गेल्या सतरा वर्षापासून ज्ञानेश्वरी प्रायमरी ईंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांकडून शाळेतील आपल्या गुरूजनांप्रती कृतज्ञता म्हणून मगुरूपोर्णिमा उत्सवाचेफ आयोजन केले जाते. व शाळेतील शिक्षकवृंदासह उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला जातो. पुढे विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शन करताना ह.भ.प. मधूसुदन महाराज म्हणाले की, भारतीय संस्कृती मध्ये प्रदिर्घ अशी गुरू परंपरा आहे. गुरूपोर्णिमा ही महर्षी व्यासांचा जन्मोत्सवाचा दिन म्हणून साजरा केला जातो. प्राचिन भारतापासून आज पर्यंतही गुरूचे स्थान हे सदैव उच्च राहिलेले आहे. गुरू हे आपल्या जीवनामध्ये इष्ट बदल घडऊन आणतात. व आपल्यामध्ये चांगल्या वाईटाची निवड करून आपल्यासाठी, निकोप समाजाच्या निर्मिती साठी काय योग्य आहे. याचे निवड करण्याचे सामर्थ्य ते आपल्याला प्रदान करतात. त्यासाठी आपले आद्यगुरू माता पित्यांशी व शिक्षकवृंदाशी प्रामाणिक रहाल तर निश्चितच तुमचे आयुष्य खूप उर्जासंपन्न होईल. असेही ते भाषणाच्या समारोप प्रसंगी म्हणाले. प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी गुरूपोर्णिमेनिमित्य आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित मान्यवर व शिक्षकवृंदानीही आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांना ह्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजीवनी साखरे, शेख आस्मा, प्रियंका लामतलवारे, सिमा जोंधळे, चांगुणा भरकडे, स्वाती कपाळे, प्रिया सामला, कान्होपात्रा तिरमाले, आरती खानसोळे,नेहा तरटे, यांसह पुरूषोत्तम कापसीकर, पठाण सर, सुनिल तारू, आनंद जाधव व छाया कोलते यांनी मार्गदर्शन व मदत केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन किशोरी घोगरे ह्या वर्ग १० वीच्या विद्यार्थीनीने केले. तर उपस्थितांचे आभार सुहानी ढगे या विद्यार्थीनीने मानले.



# कामगार कुटूंबियांनी शिक्षण आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

## जिल्हा प्रशासनाचा कामगारांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम

## वाजेगाव येथे कामगारांसाठी नोंदणी व आरोग्य शिबिर संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : कामगारांच्या कुटूंबियांनी शासनाच्या शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत कामगार बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच असंघटीत क्षेत्रातील कामगारांना शासनाच्या विविध योजना लाभ देण्यासाठी कामगारांची नोंदणी व आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे आयोजन वाजेगाव नोबल फंक्शन हॉल येथे केले होते. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, कामगार कल्याण सहाय्यक आयुक्त अनिकेत थोरात, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण मुंडे, नायब तहसिलदार सुनिल माचेवाड, संजय नागमवाड, वाजेगावचे सरपंच जमील सेठ आदीची उपस्थिती होती. वंचित, उपेक्षित घटकांना शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात, त्यांना त्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच उपक्रमाच्या माध्यमातून आज कामगारांच्या नोंदणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा जिल्हा प्रशासनाचा स्तुत्य उपक्रम असून या शिबिराच्या माध्यमातून महिला, असंघटीत कामगार यांना आरोग्य, शिक्षणासह इतर विविध सुविधांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. या शिबिराचा त्यांनी लाभ घ्यावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले. या शिबिरात कामगारांचा नोंदणी स्टॉल, आयुष्यमान कार्ड स्टॉल, आरोग्य शिबिर स्टॉल असे विविध योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिरात महिलांची संख्या मोठया प्रमाणात होती. तसेच सीएससी सेंटर चालकांनी या शिबिरात नोंदणी करण्यासाठी मोठया प्रमाणात योगदान दिले आहे. या शिबिरात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी आरोग्य विषयक माहिती देवून महिलांनी आपली तपासणी करुन घ्यावी असे सांगितले. तसेच त्यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कामगारांना मिळणाऱ्या शासनाच्या विविध योजनेची माहिती देवून कामगार आयुक्त अनिकेत थोरात यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात महिला व पुरुष असे एकूण ४९१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तर रक्त तपासणी १५६ रुग्णांची करण्यात येवून, १६ रुग्णांची इसीजी तपासणी करण्यात आली. १४५ लोकांना आयुष्यमान कार्ड वितरीत करण्यात आले तर २२५ कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात आली. या शिबिरात एकुण १ हजार ३३ लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले.



दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ जुले २०२५
https://lokaarambh.com



# पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करा



बीड-प्रतिनिधी जून आणि जुलै महिन्यात म्हणजेच ऐन पावसाळ्यातच पाऊस अचानक बंद झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केलेल्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांवर दुबार पेरणीचे संकट येऊन ठ ेपले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यात आणि एकूण बीड जिल्ह्यातच पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारली. त्यामुळे शेतात पेरणी केलेल्या पिंकाचे संपूर्ण नुकसान झाले आहे. आणि शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. सोबतच सातत्याने विद्युत पुरवठाही शेतकऱ्यांना मिळत नसल्याने शेतीपिकांना दोन्ही बाजू ंनी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे झ ा ल ेल्या नुकसानींबाबत महसूल आणि कृषी विभागाकडून पीकनिहाय पंचनामे करून शेतकरी बांधवांना अर्थसहाय्य आणि दुबार पेरणीसाठी सहकार्य करावे. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# गणेशोत्सव आता, महाराष्ट्र राज्य महोत्सव;



मुंबई । प्रतिनिधी लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या १०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून आज घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ऍंड आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली. विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला, या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच आज हा उत्सव देशभरात चालू आहे, महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असलेला आपला गणेशोत्सव आहे. देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहील. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला कुठे ना कुठे परंपरागत गणेशोत्सव बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न विविध न्यायालयात जरूर केला. पण मला या ठिकाणी मुद्दामहुन उल्लेख करायचाय हे महायुतीचं सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात या सगळ्या निर्बंधांना, आलेल्या स्पिड
ब्र`करला बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले. पीओपीच्या परंपरागत मुर्त्यांवर बंदी आणताना सीपीसीबीच्या गाईडलाईन्सचा तत्कालीन सरकारच्या काळातल्या सरकारने बाऊ केला गेला. त्यानंतर पीओपी मुर्त्यांच्या बाबतीमध्ये पर्यावरण पूरक अन्य पर्यायांना समोर ठेवून पीओपी पर्यावरणाला घातक आहे की नाही, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका आमच्या विभागाने घेतली. राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला.



मध्य प्रदेश राज्यातील सिहोर येथील कुबेरेश्वर धाम या ठिकाणी गुरुपौर्णिमेनिमित्त ङ्गङ्घभागवत भूषण पंडित प्रदीप जी मिश्रा यांचे ङ्गङ्घशिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे,प्रसिद्ध उद्योगपती हनुमानसेट बियाणी,व्यापारी महासंघाचे सदस्य केदारसेट जाजु,सुदर्शन पाटील यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

## प्रशासक SDM कविताताई जाधव, सी.ओ. नीताताई अंधारे यांच्या कारभारावर तीव्र नाराज

# बीड शहर बचाव मंचने घेतली प्रशासकांची भेट..

बीड प्रतिनिधी : काल दि.९ जुलै रोजी बीड शहर बचाव मंचाच्या समितीने नगर परिषदेच्या प्रशासक डऊ्र मा. कविताताई जाधव यांची, बीड शहरात स्ट्रीट लॅम्प अभावी अनेक भागांमध्ये महिला भगिनी मुले,मुली व खास करून ज्येष्ठ नागरिकांना दररोज अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यातच मोकाट जनावरे व कुत्र्यांचा त्रास बऱ्याच काळापासून मोठ्या प्रमाणावर बीडची जनता सहन करत आहे, मोकाट जनावरं व कुत्र्यानं मुळे अपघाताचे शहरांमध्ये प्रमाण प्रचंड वाढले आहे, यामुळे अनेक अनेक नागरिकांना अपंगत्व आलेले आहे. नागरिकांच्या जीवाला दररोज धोका निर्माण होत आहे. या सर्व जनतेच्या समस्यांविषयी भेट घेतली. बीड करांच्या या अडचणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळीडऊ्र प्रशासक मा. कविताताई जाधव यांनी मुख्याधिकारी नीताताई अंधारे व नगरपरिषदेच्या गलथान कारभारावर खूपच तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्याधिकारी नीताताई अंधारे व नगरपालिकेच्या सर्व गलथान कारभारावर मी लवकरच जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेऊन चर्चा करणार आहे व शासनाला वरिष्ठ पातळीवर सर्व प्रकाराची माहिती देणार आहे असे त्यांनी ठाम पणे सांगितले. यावर बीड



शहर बचाव मंचाच्या समितीने, बीड शहरातील जनता अनेक समस्यांना तोंड देत आहे मूलभूत सोयीसुविधांचा फार मोठ्या प्रमाणावर आभाव बीड शहरांमध्ये आहे तरी माननीय प्रशासक यांनी बीड शहरातील जनतेच्या सर्व समस्यांवर आपण सखोल लक्ष घालावे अशी विनंती केली आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने निमंत्रक व अध्यक्ष नितीन जायभाये यांनी बाजू मांडली. यावेळी चर्चेत यावेळी झालेल्या चर्चेत प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे सर, प्रमुख सल्लागार ॲड. नितीन वाघमारे, ॲड.अनिल बारगजे, शहराचे उपाध्यक्ष परवेज भाई कुरेशी, ॲड. विलास ढाकणे, बाजीराव ढाकणे, देवा कुलकर्णी, डॉक्टर संजय तांदळे, सुधीर भाऊ देशमुख, ॲड.सुनील आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिवाजीराव सिरसाट यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील भूमिपुत्र व सद्या शिवाजीनगर पोलीस ठाणे नांदेड येथे कार्यरत असलेले शिवाजी दिगंबरराव सिरसाट यांनी नांदेड पोलीस दलात ३२ वर्षे उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल त्यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती कारण्यात आली आहे. शिवाजीराव सिरसाट यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गावंडे व सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या पदोत्रतीच्या निर्णयामुळे पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदात झालेल्या वाढीमुळे एकूणच तपासी अधिकाऱ्यांच्या संख्येत वाढ



झाली आहे. यामुळे गुन्ह्याचा तपास तसेच सामान्य नागरिकांना मदत होईल. पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून भरती झालेल्या शिवाजीराव सिरसाट यांनी आतापर्यंत नांदेड मुख्यालय, मुखेड, रामतीर्थ, नायगाव, इतवारा, भाग्यनगर, आदी ठिकाणी उत्कृष्ट सेवा केली आहे. ते आता शिवाजीनगर पोलीस ठाणे नांदेड येथे कार्यरत आहेत, त्यांना मिळालेल्या पदोन्नती बद्दल पोलीस दलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या या पदोन्नती बद्दल गावकरी व मित्र मंडळी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# विनाअनुदानित शिक्षकांना दिलासा ;टप्पा वाढीचा प्रश्न मार्गी

## अधिवेशन संपताच वाढीव टप्प्याचा पगार खात्यात मिळणार: मंत्री गिरिष महाजनांची मोठी घोषणा

मुंबई दि.९(प्रतिनिधी)- विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांच्या
टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीच्या मुख्य मागणीसह इतर मागण्या करीता शिक्षक सम न्वय संघाच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनाची गुरूवार दि.९ रोजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखल घेतली. शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीत दिले. त्या नंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून थेट आझाद मैदानात येऊन मंत्री गिरीश महाजन यांनी अधिवेशन संपताच वाढीव टप्प्या प्रमाणे आपल्या खात्यात पगार जमा होईल असे सांगून शासनाच्या धोरणा बाबत सविस्तर माहिती दिली. मंत्री गिरिष म हाजनांच्या या माहिती नंतर शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले.
यावेळी आ. श्री. विक्रम काळे, आ. श्री. किशोर दराडे, आ. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. श्री. किरण सरनाईक, आ. श्री. जयंत



आजगावकर यांच्यासह शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील दिवसांपासून मुंबईच्या आझाद मैदानात विनाअनुदानित शिक्षकांनी विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढीसाठी निधीची तरतूद करा मागणीसाठी आंदोलन सुरु केले होते. दि. ८ आणि ९ जुलै रोजी राज्यातील सर्व शाळा बंद आंदोलन करण्यात आले होते. सलग दोन दिवस शाळा बंद आंदोलन करून सर्व शिक्षक आझाद मैदानावर आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे सलग दोन दिवस आझाद मैदान आंदोलक शिक्षकांच्या गर्दीने हाउसफुल झाले होते. या आंदोलनावरुन विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले होते. विनाअनुदानित शिक्षकांना न्याय मिळावा या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, खा. सुप्रिया सुळे यांच्यासह आ. रोहित पवार यांनी देखील शिक्षकांची आझाद मैदानात भेट घेत राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. त्यानंतर सरकारने आंदोलक शिक्षकांच्या शिष्टमंडळाची गुरूवार दि.९ रोजी बैठक झाली. या बैठकीत शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाला दिले. त्यानंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः आझाद मैदानात येऊन विनाअनुदानित शिक्षकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याची घोषणा केली. यामुळे विनाअनुदानित शिक्षकांना मोठा दिलासा मि ळाला आहे. यावेळी मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, आमची जी भूमिका आहे ती सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी हीच आहे. त्यामुळे धाडसी निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यानुसार २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के,८० टक्के पगार खात्यात जमा केला जाणार आहे. सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. मात्र आता तुम चा प्रश्न मार्गी लागला आहे. तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हे ठरलं की, आम्हाला तुम च्या खात्यात पगार टाकायचाच आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू सम ाजावून घेऊन १८ जुलैला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील आणि यात कोणताही बदल होणार नाही असं मंत्री गिरिष महाजन यांनी सांगितले. त्या नंतर आंदोलक शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले.

# सादिक इनामदार यांच्यावरचे खोटे गुन्हे मागे घ्या - नवीदोद्दीन सिद्दिकी



माजलगाव (प्रतिनिधी) - महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षणखधिकाऱ्यांचे बरेच दिवसापासून बरेच घोटाळे चालू असून देखील एका शिक्षणाधिकाऱ्यांचा घोटाळा धारूर चे सादिक इनामदार यांनी बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणचे शिक्षण संचालकांचे शिक्षकांचे व इतर घोटाळे शासनाला निर्दे शनात आणून देण्यासाठी वेगळेवेगळे पद्धतीने उपोषण आंदोलन चे निवेदन अर्जद्वारे भ्रष्टाचार उघडा पाडण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान काही शिक्षक व महिला शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याचा आरोप करून त्यांच्यावर शासकीय व राजकीय शक्तीचा उपयोग करून खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न हे शिक्षणाधिकारी करीत आहे. म्हणून पोलीस प्रशासनाने सदरील बीड जिल्ह्याचे शिक्षण व शिक्षणाधिकारी यांचे भ्रष्टाचार जनतेसमोर आणून शासनाचे निर्देशनात आणून देत असल्यानेच सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांच्यावर एक महिला शिक्षणाधिकारी यांनी षडयंत्राद्वारे खोटे गुन्हे दाखल केले आहे. म्हणून बीड पोलीस प्रशासनाने खोटे गुन्हे मागे घेऊन सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांना शिक्षणाधिकारी यांच्या षडयंत्रनेतून मुक्त करावे अशी मागणी समाजवादी पक्षाचे म ाजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली

# भंगार लिलाव घोटाळ्याच्या चौकशीसाठी गेवराई तहसील कार्यालयासमोर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांचे आमरण उपोषण सुरू

गेवराई (प्रतिनिधी) — गेवराई तहसील कार्यालयात झालेल्या कथित भंगार लिलाव घोटाळ्याने तालुक्यात खळबळ उडवून दिली आहे. माजी नगरसेवक सय्यद एजाज इफ्तेखार अहमद यांनी तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर गंभीर आरोप करत, १० जुलै २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांनी हा लिलाव संगनमताने व नियमबाह्य पद्धतीने पार पाडल्याचा आरोप करत या प्रकरणात शासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा केला आहे. तक्रारीतील आरोप काय आहेत? सय्यद एजाज यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या लेखी तक्रारीत असे म्हटले आहे की, २९ मे २०२५ रोजी पार पडलेल्या भंगार लिलावात संगनमताने लिलाव केला गेला. एका व्यक्तीने दोन वेगवेगळ्या अर्जाद्वारे दोन लोकांना लिलाव प्रक्रियेत सहभागी करून गैरप्रकार घडवला. लिलावाची तारीख वारंवार पुढे ढकलून पारदर्शकतेला हरताळ फासण्यात आला. १०,००० रुपयांची अनिवार्य ठेव रक्कम रोख स्वरूपात





स्वीकारण्यात आली, ज्यामुळे आर्थिक व्यवहाराची पारदर्शकता पूर्णतः हरवली. या सर्व घडामोडी तहसील कार्यालयाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचा दावा एजाज यांनी केला आहे. मागण्या काय आहेत? 1. तहसीलदार संदीप खोमणे यांची तात्काळ चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी. 2. लिलावाची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती गठित करावी. 3. झालेला लिलाव रद्द करून, उपविभागीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली नव्याने लिलाव करावा. लोकप्रतिनिधींचा पाठिंबा: या आमरण उपोषणाला अनेक सामाजिक व राजकीय व्यक्तींनी पाठिंबा दर्शवला असून, यामध्ये लोकनेते बाळराजे पवार, शिवसेना युवा नेते यशराज पंडित, माजी नगराध्यक्ष ब्रह्मादेव धुंरंधरे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, शिवसेना तालुका प्रमुख अजय दाभाडे, नगरसेवक जानमोहमंद बागवान, सय्यद बदियोद्दीन, शेख शहेदाद, बाळासाहेब गायकवाड, मुश्ताक कुरैशी, शौकत पठाण आदींचा समावेश आहे. प्रशासनाकडून प्रतिक्रिया अद्याप नाही उपोषण सुरू झाल्यानंतरही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, प्रशासनाविरोधात रोष वाढत आहे. सय्यद एजाज यांनी मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तहसील कार्यालय आणि जिल्हा प्रशासन यांची पुढील पावले काय असतील याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ जुले २०२५
https://lokaarambh.com



# दफनविधीची तयारी सुरु, अचानक ऐकायला आल्या बाळाच्या किंकाळ्या: बीडमध्ये मोठा चमत्कार!

बीड : या जगात कधी काय होईल हे सांगता येत नाही. पृथ्वीवर याआधी असे काही चमत्कार झालेले आहेत, ज्यावर आजही विश्वास ठेवणं कठीण जातं. वैद्यकीय क्षेत्रात तर कधीकधी डॉक्टरांनाही अचंबित करून टाकणारे प्रकार घडतात. सध्या बीड जिल्ह्यातही संपूर्ण महाराष्ट्राला चकित करणारी एक अजब घटना घडली आहे. येथे मृत्यू झालेलं नवजात बाळ अचानक जिवंत झालं आहे. विशेष म्हणजे कित्येक तास शवपेटीत ठेवूनही दफनविधीच्या वेळी लोकांना बाळाचं रडणं ऐकायला आलं आहे.

नेमकं काय घडलं?

बीड जिल्ह्यात घडलेल्या या प्रकाराची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार बीडमधील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात डॉक्टरांनी एका बाळाला मृत म्हणून घोषित केले होते. आमच्या बाळाचा मृत्यू झाल्याचे समजताच त्याच्या आई-वडिलांनी हंबरडा फोडला होता. पण दफन करण्याच्या काही क्षण अगोदर ते बाळ रडायला लागल्याचे समोर आले आहे.

नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचे सांगितले पण...

अंबाजोगाई तालुक्यातील होळ येथील एका कुटुंबातील महिलेची 7 जुलै रोजी 2025 रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय विद्यालयात प्रसूती झाली होती. यावेळी नवजात बाळाचा मृत्यू झाला होता, असे सांगण्यात आले होते. डॉक्टरांनी सर्व तपासण्या करून तसा निर्णय देऊन टाकला होता. डॉक्टरांनीच आपले बाळ मृत असल्याचे सांगितल्यानंतर नुकतेच प्रसूत झालेल्या महिलेने आणि तिच्या पतीनेही बाळ जिवंत असल्याची आशा सोडून दिली होती.

आजीने केला हट्ट अन्...

त्यानंतर या बाळाला दफन करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली. विशेष म्हणजे दफन करण्याआधीच अचानक बाळाच्या किंकाळ्या ऐकायला आल्या. बाळ दफन करण्याच्या काही मिनिटे अगोदरच बाळ जिवंत झाल्याचे समोर




आले. नवजात बाळाच्या आजीने बाळाचा चेहरा बघण्याचा अट्टाहास केल्याने हा सगळा प्रकार समोर आला.

रुग्णालयप्रशासनावरगंभीरप्रश्नउपस्थित

दरम्यान, विशेष म्हणजे हे नवजात बाळ 10 ते 12 तास शव पेटीत ठेवण्यात आलं होतं. तरी ते दफनविधीच्या अगोदर जिवंत झालं. ही बाब समोर येताच नवजात बाळाला तातडीने अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या बाळावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर आता डॉक्टरांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. डॉक्टरांनी बाळाची नीट तपासणी केली होती का? असे विचारले जात असून याबाबत योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

पाच जणांची समिती स्थापन, चौकशी होणार

तर दुसरीकडे डॉक्टरांनी याबाबत रुग्णालयाची भूमिका स्पष्ट केली आहे. या संदर्भात पाच लोकांची समिती तयार करण्यात आली असून यामध्ये जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल

## जुनी पेंन्शन व शंभर टक्के अनुदानासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

बीड। प्रतिनिधी सर्वांना जुनी पेंन्शन योजना लागू करण्यात यावी, विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे, इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यथानियम वेतन व सेवासंरक्षणाचे सेवानियम लागू करण्यात यावेत या व इतर मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाने येथील शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर जोरदार धरणे आंदोलन केले. राज्यातील शिक्षक व शिक्षणाच्या दुरावस्थेकडे लक्ष वेधण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाने मराठवाड्यातील सर्व माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाची हाक दिली होती. त्यानुसार येथे मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, जिल्हा सचिव गणेश आजबे यांचे नेतृत्वाखाली आंदोलन झाले. माध्यमिक विभागाचे अधीक्षक मा अजय बहीर यांनी निवेदन स्वीकारले. निवेदनात सर्वांना जुनी पेन्शन, ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी, राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार १००% अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवावी. शाळांच्या संचनिर्धारणामधे क्रिडा व कला शिक्षकांची पदे मंजूर करावीत. राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यथानियम



वेतन व सेवासंरक्षणाचे सेवानियम लागू करण्यात यावेत. राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १०,२०,३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु भनिनि व एनपीएस खाते नसलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या फरकाचे हप्ते रोखीने देण्यात यावेत. राज्यातील शिक्षकांची सुमारे ६५००० रिक्त पदे तात्काळ भरावीत. पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व माध्यमांच्या शाळांना शंभर टक्के वेतन आणि वेतनेतर अनुदान देण्यात यावे. सर्व शैक्षणिक संस्थांचे वेतनेतर अनुदान सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. आंदोलनात मराठवाडा शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष युवराज मुरूमकर, दत्तात्रय चव्हाण, विनोद सवासे, दादासाहेब घुमरे, एम. डी. डोळे, पुरुषोत्तम येडे पाटील,प्रभाकर उंबरे, रमाकांत शेळके, मधुकर चौरे , नागरगोजे सर यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले होते.

## पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती व संस्थेच्या संस्थापिका केशरकाकू क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर सर्व कर्मचारी वृंद यांनी प्रतिमेला अभिवादन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दहिफळे होते तर प्रमुख पाहुणे उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोडंगे माध्यमिक पर्यवेक्षक रत्नपारखी रत्नपारखी जेष्ठ शिक्षक रामराम देशपांडे रमेश घोडके आदिंची उपस्थिती होती कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दहिफळे बोलताना म्हणाले की सर्वांच्या जिवनाची जडणघडण गुरु मुळेच होते गुरुच्या ज्ञानामुळे प्रेरणा मिळते गुरुमुळेच सर्वांचे जीवन प्रकाशमय होते त्यामुळे सर्वांनी सर्वप्रथम आई वडील व शिक्षकांना गुरुचे मानाचे स्थान मनात निर्माण करावे अशी अपेक्षा प्राचार्य दहिफळे यांनी व्यक्त केली या कार्यक्रमास प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रजनी इंगोले यांनी केले तर आभार महेश उगलमुगले यांनी मानल



लिंबागणेश । प्रतिनिधी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गुरूपौर्णिमा उत्सव आज (दि. १०, गुरुवार) मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला, तसेच श्रीगुरू ईश्वरबाबा महाराजांच्या समाधीची महापूजा करण्यात आली.

## जुन्या पाण्याच्या टाकीमुळे गुंतेगावातील ८० विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका

गेवराई । प्रतिनिधी एकही मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासन विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे त्यांना पोष्टिक आहार, शूज, पुस्तके शाळेचा गणवेश, खेळण्या सर्व काही मोफत देत आहे तर दुसरीकडे गु ंतेगाव येथील जिल्हा परिषदच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या ८० विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत आहे. वारंवार कळवून ही जिल्हा परिषद शाळेतील जुनी झिन्न झालेली पाण्याची टाकी पाडून टाकत नसल्याने एखाद्या विद्यार्थ्यांचा जीव गेल्यावर ती टाकी पाडणार का? असा सवाल ग्रामस्थ करत आहेत. गेवराई तालुक्यातील गु ंतेगाव येथे जिल्हा परिषद ची सुसज्ज अशी शाळा आहे. या शाळेमध्ये ८० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. शाळेमध्ये ४०-५० वर्ष पूर्वी बांधलेली पाण्याची टाकी आहे परंतु ही टाकी सध्या झिन्न झालेली आहे. तिचा काही भाग पडलेला असून ती पाण्याची टाकी शेवटची घटका मोजत असून कधीही पडू शकते. यामुळे या शाळेत शिकणाऱ्या ८० विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत आहे. शाळेतील शिक्षकांनी ग्रामपंचायतला वारंवार कळवले व ग्रामपंचायतने ही पंचायत समितीला याबाबतची तक्रार केली असल्याचे बोलले जात असून, अद्यापही ही टाकी पाडण्याचा कोणताही आदेश आला नाही व ती पाडलेली नाही. त्यामुळे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपला जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. जुनी झिन्न झालेली पाण्याची टाकी



पडून एखांद्या विद्यार्थ्याचा जीव गेल्यावर पाडणार का? असा सवाल गुंतेगाव येथील नागरिक करत असून, सध्या तिचा कसल्याही प्रकारचा उपयोग होत नाही

# सिंदफणा शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांची युनेस्कोच्या कार्यशाळेसाठी निवड

माजलगाव प्रतिनिधी - येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलचे कार्यतत्पर प्राचार्य अन्वर शेख यांना युनेस्को तर्फे आरोग्य आणि कल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी आयोजित केलेल्या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. सविस्तर वृत्त असे की, यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यशाळेचे उद्दिष्ट सीबीएसई संलग्न शाळांमधील मुख्य प्रशिक्षकांना क्षमता निर्माण करून देणे आहे. हे प्रशिक्षक त्यांच्या स्वतःच्या शाळांमध्ये आरोग्य आणि कल्याण कार्यक्रम राबवण्याबरोबरच शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी संसाधन व्यक्ती म्हणूनही काम करतील. या कार्यशाळेसाठी यादीत समावेश आहे, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख आणि महावीर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अभिलाष के के यांचा समावेश आहे.सदरील कार्यशाळा दिनांक २१ जुलै ते २५ जुलै २०२५ या काळात शेख यांना आणि सिंदफणा पब्लिक स्कूल ला आरोग्य कार्यक्रमाच्या क्षेत्रात नवीन दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.भारतभरातील केवळ १०० नवी दिल्ली येथे होणार आहे. युनेस्को च्या नवी दिल्ली प्रादेशिक कार्यालयाकडून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमाद्वारे शैक्षणिक भारतातील हजारो सीबीएसई संलग्न शाळांमधून केवळ १०० प्राचार्यांची निवड करण्यात आली आहे. युनेस्को,एनसीईआरटी आणि सीबीएसई महाराष्ट्रातील फक्त ४ प्राचार्यांचा या संस्थांमध्ये आरोग्य आणि कल्याणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करण्याचे लक्ष्य आहे. या प्रशिक्षणामुळे प्राचार्य अन्वर निवडक प्राचार्यांमध्ये स्थान मिळणे हे केवळ बीड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संबंध मराठवाड्यासाठी अभिमानाची बाब आहे. ही निवड म्हणजे अन्वर शेख यांनी आज पर्यंत शिक्षण क्षेत्रासाठी केलेला त्याग,



परिश्रम आणि समर्पनाचा योग्य सन्मान होय. त्यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीचा आणि शिक्षण क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीचा हा एक पुरावाच आहे. या प्रतिष्ठित कार्यशाळेसाठी निवड झाल्याबद्दल प्राचार्य अन्वर शेख यांचे सिंदफणा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, डॉ. वरुणराज तौर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केल

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com